
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | AUG - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य

प्रा. सुमन केंद्रे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर.

## प्रस्तावना:



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी शूद्रअतिशुद्रांसाठी शैक्षणिक योगदान दिले तेवढेच त्यांनी सामाजिक कार्यातही मोलाचे योगदान दिले आहे पुरुषप्रधान भारतीय समाजरचनेमध्ये महिलाना अत्यंत हीन स्थान देण्यात आलेले होते. ही समाजव्यवस्था लादण्याचे काम येथील धर्म व्यवस्थेने केले होते: आणि ही धर्म व्यवस्था पुर्णपणे मनुने लिहलेल्या मंनुस्मृतीवर आधारित होती व्यवसायापासून ते अगदी खानपानापर्यंत समाज जीवन नियंत्रित करण्याचे काम मनुवादी प्रवृत्तीच्या लोकांनी केले होतेहेच समान जीवन फुलयांच्या काळापर्यंत चालू होते. महार-मांग समजल्या जाणाऱ्या लोकांकडून विटाळ होतो अशी ब्राहमणांची शिकवण अस्पृश्यांच्या मनात घर करून बसली होती स्रिया आणि शुद्रांचे शोषण सारखेच होते. महात्मा फुल्यांच्या सोबत राहून शैक्षणिक कार्यासोबत सामाजिक कार्यही मोठ्या हिरारीने सावित्रीबाई नी केलेपरंतु पाहिजे तेवढी त्यांच्या कार्याची नोंद इतिहासात झाली नाही म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात सावित्रीबाई फुल्यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## बालपण :

सावित्रीबाईचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव ता. खंडाळी जि. सातारा येथे खंडोजी नेवसे पाटील व लक्ष्मी यांच्या पोटी झाला. लहानपणापासूनच जिज्ञासू वृत्ती असल्याने नवीन गोष्टींची माहिती करून घेण्यात त्यांना आवड होती महाराणी ताराबाई , हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराज त्यांचे आदर्श होते ज्योतीरावाशी त्यांचा विवाह १८४० मध्ये झाला. त्यावेळी ज्योतीरावाचे वय १३ तर सावित्रीबाईचे वय १० वर्षे होते.

## ज्योतीबांच्या शैक्षणिक कार्यात सावित्रीबाईचे योगदान :

शेकडो वर्षापासून गुलामगिरीचे आणि हिंनतेचे जीवन जगणाऱ्यास्रियाचा उदधार महात्मा फुल्यांनी केला. त्यासाठी त्यांनी आपल्याच पत्नीला सावित्रीबाईना शिक्षण देवून शिक्षिका म्हणून तयार केले यावेळी सावित्रीबाईनी संसार, मुलबाळ किवा घरदार याची पर्वा न करता आपल्या पतीच्या कार्यासाठी एच्छिक सुखाचा त्याग करून जगाचा संसार केला त्यासाठी ट्रेनर, शिक्षिका, मुख्याध्यापिका म्हणून काम केले. यासाठी त्यांनी हालअपेष्टा, निंदा-नालस्ती, शिव्या-शाप, संकटे यांना समोरे जाऊन ती कठोरपणे पचविली शिक्षणाचे करी अविरतपणे चालू राहावे आणि प्रतिकूल परस्थिती यावर मात करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले म्हणूनच जोतिरावांच्या कार्यात सावित्रीबाई खऱ्या अर्थाने अर्धांगींनी आणि प्रेरणा होत्या. पालकांच्या भेटी घेऊन मुलींच्या शिक्षणाचे महत्व त्यांना पटवून दिले शकडो वर्षापासून शिक्षणापासून वंचित असणाऱ्यास्रियांना त्यांनी शिक्षणाची दारे उघडी करून दिली

### स्रिमुक्ती आंदोलांनाच्या प्रणेत्या:

१९ व्या शतकातील स्रियांना गुलामासारखे जीवन जगावे लागत होते देवधर्म आणि कर्मकांडामध्ये स्रियांना जोखडून टाकण्यात आले होते. स्रि म्हणजे पुरुषांच्या कामवासणा, इच्छेप्रमाणे गरजा भागवणारी एक वस्तु असे मानले जात होते. तिला इच्छा आकांक्षा असू शकतात हे मान्य करण्यास ब्राह्मणांनी नकार दिला होता. हिंदू धर्मातील स्रियांवर जेवढा अन्याय झाला तेवढा जगात कोणत्याही धर्मातील स्रियांवर झाला नाही. स्रियांनी शिंक्षण घेतले तर त्या स्वैराचारी बनतील त्यांचे नवरे लवकर मरतील अशी भीती दाखवून त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले होते.

अशा वेळी सावित्रीबाई फुले यांनी स्रिमुक्तीचे कार्य हाती घेतले स्रियांचे दुख पाहून त्या रडत बसल्या नाहीत तर स्रिमुक्तीसाठी जो संग्राम अपेक्षित आहे तो त्यांनी मोठ्या जिद्दीने चिकाटीने चालविला स्रिशिक्षणाबरोबर बालविवाह, केशवपन, भ्रूणहत्या, सतीची चल अशा प्रथाना त्यांनी विरोधा केला. महिला शिकली पाहिजे, सशक्त झाली पाहिजे यासाठी त्यांनी जीवनभर लढा दिली आणि मोठ्या कौशल्याने तो यशस्वी सुद्धा केला. स्रियांच्यात प्रबोधन, सुधारणा झाली पाहिजे यासाठी त्यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केलीजातिभेद न करणे हा ही हेतु त्याच्या स्थापणे मागेहोता. तिळगुलांच्या सारखे कार्यक्रम हाती घेऊन त्यांनी स्रियांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला

### बालहत्या प्रतिबंधक गृह :

१९ व्या शतकात समाजात बालविवाहाची प्रथा होती. त्या मुलीचा पती वारला की तिला वैधव्याचे जीवन जगावे लागत होते अशा वेळी समाजात तिला फसवणारे अनेक पुरुष असत किवा चुकून तिचे पाऊल वाकडे पडले आणि ती गरोदर राहिली तर आत्महत्येशिवाय तिला पर्याय नव्हता. तिच्या सोबत त्या पोटातल्या अर्भकाचीही जीव जात होता. यातून मार्ग काढण्यासाठी जोतिबा आणि सावित्रीबाईनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली अनेक स्रिया येथे येऊन राहत आणी बाळंत होत असत त्यातील एक काशीबाई होती. १८७४मध्ये तिच्याच यशवंत नावाचा मुलगा फुले दांपत्याने दत्तक म्हणून घेतलाकारण जोतिबांना मूल नव्हते दुसऱ्या लग्नास त्यांनी विरोध करून स्रि-पुरुष समानतेचा आदर्श घालून दिला सावित्रीबाईं नी जोतिराव फुल्यांनी सुरू केलेल्या क्रांतिकार्याच्या सरसेनाणी सावित्रीबाई होत्या हे दाखवून दिले.

### केशवपन या अनिष्ट प्रथेस विरोध :

समाजात एखाद्या स्रिचा पती मेला तर ती स्रि पुन्हा सुंदर दिसू नये व पुरुषांकडे आकर्षित होऊ नये यासाठी तिच्या डोक्यावरचे केस काढले जात. ही प्रथा ब्राहमणात जास्त होती. अशावेळी त्या विधवेला अंधाऱ्या कोठडीत बसविले जाई आणि तिचे केशवेपण केले जात असत. यावेळी तिच्यावर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. पीएन महात्मा फुल्यांनी आता यापुढे न्हावी केस काढणार नाहीत याकरिता न्हावयांचा संप घडवून आणला यामध्ये न्हाव्यांचे नुकसान होते तरी पण जोतिबा सावित्रिणी केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत संप यशस्वी केला आणि केशवपन प्रथा बंद पाडली. यात सावित्रीबाईं नी हिरारीने पुढाकार घेतलाहोता.

### सत्यशोधक समाज आणि सावित्रीबाईं :

म. जोतिराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रो सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून सत्य शोधून काढणे, हुंड्याशिवाय कमी खर्चात लग्न करणे, ब्राह्मण पुरोहितशीवाय स्त्यशोधक पद्धतीने लग्न पार पाडणे हे कार्य जेव्हा सत्यशोधक समाजाने हाती घेतले त्यावेळी सावित्रीबाईं हा खऱ्याकार्यकर्त्या होत्या. सत्यशोधक समजाच्या स्थापणे नंतर शेकडो वर्षाची धार्मिक परंपरा बाजूला सारून संपूर्ण देशात या पद्धतीने विवाह पार पडू लागले. सावित्रीबाईं नी मैत्रीण बाजूबाई यांची कन्या राधा आणि सीताराम जबाजी आल्हाट यांचा पहिला विवाह सत्यशोधक पद्धतीने झाला. पुढे आपला दत्तक मुलगा यशवंत याचा विवाह याच पद्धतीने झाला, यावेळी समजतील ब्राह्मण वर्चस्वामुळे फुले दाम्पत्याना मोठा विरोध झाला. यामुळे फुले दाम्पत्याना खुप त्रास सहन करावा लागला पन त्यांनी हाती घेतलेले कार्य सोडले नाही. या क्रांतिकार्यात सावित्रीबाईं चा मोलाचा वाटा होता

### समाज उपयोगी कार्य आणि सावित्रीबाईं :

जोतिबानी जातिभेद निर्मूलनाचे कार्य हाती घेतले होते जाती भेद नष्ट होऊन एकसंघ समाज निर्माण व्हावा यासाठी सावित्रीबाईं नी समान प्रबोधनाचे कार्य केले. १८७६-७७ ला जेव्हा महाराष्ट्र दुष्काळ पडला त्यावेळी सावित्रीबाईं च्या नेतृत्वाखाली जागोजागी अन्नछत्रे

उभारली. त्याठिकाणी स्वता सावित्रीबाई स्वयपाक करीत व अन्नछत्रातील मुलांना भोग घालीत असत. पुढे म फुले यांनी सत्यधर्माची घोषणा केली. समाज प्रबोधन केले. अस्पृश्यांसाठी घर, विहिरी वापरण्यास खुले केली. आपल्या घरच्या पाण्याचा हौद खुला केला व अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले जातिभेद नष्ट करण्यात जोतिरावांना सावित्रीबाई नी मोठ्या प्रमाणात साथ दिली.

**मूल्यमापन :**

१९ व्या शतकात जिथ महिलाना घराबाहेर पडता येत नव्हते त्यावेळी स्वत शिक्षण घेऊन शिक्षिका होऊन मुलींना शिकविणे त्यांना त्यांच्यात प्रबोधन घडवून आणणे हे क्रांतिकार्य सावित्रीबाई नी केले स्त्रि उद्धाराचे कार्य हे ईश्वराचे कार्य आहे हे समजून त्यांनी महिला सक्षम झाल्या पाहिजे सबल झाल्या पाहिजेत यासाठी कार्य केले. महिला सेवा मंडळाच्या माध्यमातून त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले. महिलाना त्यांचे हक्क मिळाले पाहिजेत यासाठी त्यांनी प्रयत्न केले व त्यांना प्रचंड त्रास समाजाकडून सहन करावा लागला. परंतु माझ्या त्रासातून हजारोंचे भले होणे असेल तर तो त्रास मी आनंदाने शान करणार अशा त्या जोतिबांच्या जवळ बोलत अस्पृश्यांच्या उदधार याबरोबरच महिला सशक्त सबळ झाली पाहिजे यासाठी त्यांनी सर्व उपाय योजले हजारो वर्षापासून समाज बंधनात पुरुषांच्या गुलामगिरीत अडकलेल्या स्रियांसाठी सावित्रीबाई नी केलेले कार्य मोलाचे आहे त्यामुळे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ह्या स्रिमुक्ती अंदोलनाच्या पहिल्या प्रणेत्या ठरतात

संदर्भ ग्रंथ:

१. हरी नरके, ज्ञानज्योत सावित्रीबाई फुले.
२. उमेश बगाडे, महात्मा ज्योतीराव फुले, गंधवेद प्रकाशन, पुणे २०१०.
३. अनुरथ काळे, विद्येची महानायिका –क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पंचफुला प्रकाशन, औरंगाबाद,२०१३.
४. म. गो. माळी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००३.